# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ / फाल्गुन २९, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री | |
| (३) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री | |
| (६) | राज्य उत्पादन शुल्क मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

### राज्यातील मच्छिमारांच्या विविध मागण्यांबाबत

**(१) * ५८४९० श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांप्रमाणे मच्छिमारांनाही आर्थिक मदत करण्यात यावी, किसान क्रेडीट कार्ड योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या छोट्या मुदतीची कर्ज व्याजासह माफ करण्यात यावी तसेच मच्छिमारांच्या डिझेल परताव्याची थकीत असलेली रक्कम अदा करण्यात यावी इ. या कोकणातील मच्छिमारांच्या विविध मागण्यांसदर्भात लोकप्रतिनिधींनी मत्स्यविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोकणातील नौकाधारक मच्छीमारांच्या डिझेल परताव्याची २०० कोटींहून अधिक रक्कम शासनाकडे थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील मच्छीमार विविध समस्यांमुळे आर्थिक संकटात आहेत, त्यामुळे मच्छिमारांच्या विविध मागण्यांसदर्भात शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) कोकणातील मच्छिमारांच्या विविध मागण्यांसदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक ०६/०१/२०२३ च्या सुमारास दिलेले लेखी निवेदन आढळून आले नाही.

(२) व (३) हे खरे नाही. फेब्रुवारी २०२३ अखेर रुपये २७३.५१ कोटीचे प्रस्ताव प्रलंबित होते. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये १६१.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

सन २०२३-२४ करिता १००.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. अर्थसंकल्पित निधी वजा जाता रुपये १२.५१ कोटी इतकी रक्कम देणे आहे. सदरहू रक्कम अदा करण्याचे नियोजन आहे.

राज्यातील मत्स्यव्यवसायिक मच्छिमार बांधवांना डिझेल प्रतिपूर्तिचा लाभ देण्यात आलेला असून KCC च्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात येते.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## खारघर व नवी मुंबई येथील अवैध दारु वाहतुकीबाबत

**(२) * ५६६१८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाने खारघर व नवी मुंबई येथे बेकायदा वाहतूक केली जाणारी साधारण ७६ लाखांची दारु जप्त केल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हलक्या प्रतीची गोव्यात बनविण्यात आलेली दारू गुजरातमध्ये नेऊन नामांकित कंपन्यांच्या बाटल्यांमध्ये भरून विक्री करण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दारुबंदी असलेल्या गुजरात मधील वडोदरा येथील रहिवाशी व पोलादपूर येथील मुळ गाव असणाऱ्या सुनिल गायकवाड नामक व्यक्तीला या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त दारू वाहतूकीच्यावेळी तपासणी केली असता अंधेरी-मुंबई येथील फार्मा कंपनीची औषधे वाहतूक करीत असल्याची बनावट कागदपत्रे सापडली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेले मद्य गुजरातमध्ये नेले जात असल्याचे दिसून येत आहे. तथापि, विक्रीसंदर्भातील बाब ही तपासाधीन आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ खाली गु. र. क्र. २५२/२०२२ नोंदविण्यात आला असून या प्रकरणी जप्त केलेल्या मुद्देमालाची वाहनासह एकूण किंमत अंदाजे रुपये ७६.७७ लाख इतकी आहे. सदर प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंबई-वडोदरा महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मुळ खातेदारास मिळण्याबाबत

**(३) * ५७३३४ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-वडोदरा द्रुतगती राष्ट्रीय महामार्गासाठी भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील नांदिठणे येथील एकूण १७ हजार ८२४ चौ.मी.जमीन संपादित करण्यात येऊन या जमिनीची नुकसान भरपाई म्हणून एकूण ११ कोटी ६६ लाख ६४ हजार ६१४ रुपये नुकसानग्रस्तांना देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित सर्व्हे क्रमांकाच्या खातेदाराचा मृत्यू झाला असून त्या सातबाऱ्यावर त्याच्या वारसांची नोंद करण्यात आली असल्याने सदर वारसदारांनी जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी तेथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रे तसेच बँक खात्याच्या माहितीसह कुलमुखत्यारपत्रही सादर करुन बाधित खातेदारांनी भूसंपादन शाखेकडे सर्व कागदपत्रांची पूर्तता केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात या प्रकरणास मंजूरी देण्यात येऊन त्यानंतर संबंधित कुलमुखत्याधारकाला मोबदल्याचा ११ कोटी ६६ लाखांचा धनादेश उपविभागीय कार्यालयाकडून देण्यात आला मात्र बँक खात्याची केवायसी पूर्तता झाली नसल्याने त्यांच्या खात्यात पैसे जमा होऊ न शकल्याने आरटीजीएसद्वारे बँक खात्यामध्ये पैसे वर्ग करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपविभागीय अधिकारी कार्यालयात आलेल्या अर्जामध्ये अन्य तिघांनी महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचे मूळ खातेदार असून बाधित प्रकल्पग्रस्त म्हणून मोबदला मिळावा अशी मागणी दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास केल्यामुळे या अर्जाची उपविभागीय कार्यालयाने पडताळणी केली असता सदरचे अर्जदारच हे मूळ बाधित खातेदार असल्याचे निष्पन्न झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यामुळे आरोपीनी बाधित मूळ प्रकल्पग्रस्तांची बनावट कागदपत्रे तयार करुन त्याआधारे कोट्यवधी रुपये घेतले असून या प्रकरणी भिवंडीच्या उपविभागीय अधिकारी कार्यालयातील अव्वल कारकुनाने दिलेल्या तक्रारीनंतर अनोळखी आरोपींविरुध्द शांतीनगर पोलीस ठाण्यांत गुन्हा दाखल केला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

(५), (६) व (७) प्रकरणी शांतीनगर पोलीस स्टेशन येथे प्रथम खबरी अहवाल क्रमांक ०२३२ दिनांक २५.०४.२०२२ रोजी अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करणेत आला आहे. सदरच्या गुन्ह्यामध्ये पोलीस तपास सुरु आहे.

-----------------

## मौजा लेकुरबोडी (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथे जंगली हत्तींमुळे घरांचे व शेतीचे नुकसान झालेल्या नागरिकांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(४) * ५६८६६ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा लेकुरबोडी (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथे जंगली हत्तीच्या समुहाने काही घरांचे व शेतीचे नुकसान केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानग्रस्त घरांचा व शेतीचा पंचनामा होवून तीन महिन्याचा कालावधी उलटूनही आजतागयत वन विभागाने नागरीकांना नुकसान भरपाई दिली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नागरिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत सतत मागणी होत असतानाही वन विभागातील अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागरीकांना जीवन जगणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसान भरपाई देण्याबाबत व वन विभागातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) मौजा लेकुरबोडी, ता.कोरची, जि.गडचिरोली येथे दिनांक २१.१०.२०२२ व दिनांक २३.१०.२०२२ रोजी गडचिरोली लगतच्या छत्तीसगड राज्यातून आलेल्या २३ जंगली हत्तींच्या कळपाने घरांचे नुकसान केल्याच्या ३ तर शेतपिकांचे नुकसान केल्याच्या ११ घटना निदर्शनास आल्या आहेत.

प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार ३ घरांच्या नुकसानीच्या प्रकरणांमध्ये संबंधितास रुपये ३७०००/- व शेतपिक नुकसानीच्या ११ प्रकरणांमध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रुपये १,४३,५००/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंबईतील आरे क्षेत्र (जोगेश्वरी - पूर्व) वसाहती अंतर्गत असलेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) * ६२३०२ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे क्षेत्र (जोगेश्वरी - पूर्व) वसाहती अंतर्गत असलेल्या ४५ कि.मी च्या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याने या रस्त्यांची देखभाल व डांबरीकरणाकरिता सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग यांनी सुमारे ४८ कोटी रुपयांचे व अंतर्गत रस्ते सिमेंट क्राँक्रिटीकरणाकरिता सुमारे रुपये १७३ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अंदाजपत्रकानुसार या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी रुपये १७३.०० कोटीचा प्रस्ताव मंजूरीकरिता शासनाकडे पाठविला होता, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी विविध आयुधांद्वारे तसेच आयुक्त तथा प्रशासक, मुंबई महानगरपालिका तसेच मा.पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य व मुंबई उपगनर जिल्हा यांनी पत्राद्वारे पाठपुरावा करुनही अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांची दुरुस्ती व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) आरे वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणासाठी रुपये ४८ कोटी व क्राँकीटीकरणाकरिता रुपये १४७ कोटी खर्चाचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केले असता सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे फक्त डांबरीकरणासाठी रुपये ४८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.

(३), (४) व (५) आरे मधील अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणासाठी रुपये ४८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे तांत्रिक मान्यता देण्यात आली असून, सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात यासाठी निधीची तरतूद करण्यासाठी वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

-----------------

**रावेर (जि.जळगांव) तालुक्यात गायरान व गुरचरण शेतीवर केलेले अतिक्रमण काढण्याबाबत**

**(६) * ६०६२३ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगांव) तालुक्यात ७ सज्जा, मंडळ आहेत त्यामध्ये अंदाजीत सुमारे ९० हेक्टर क्षेत्राच्यावर गायरान व गुरचरण क्षेत्र असुन यापैकी किमान ६२ हेक्टरवर अतिक्रमण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील ९ गावांतील ६२० अतिक्रमणधारकांना शेतीवरील अतिक्रमण काढण्यासाठी संबंधित तहसिलदारांनी निष्कासनाची नोटीस बजावली होती. गावांमधील गायरान जमिनीवरील केळीबागा महसूल प्रशासनाने उध्वस्त करुन संपूर्ण अतिक्रमण काढले. परंतु अतिक्रमण काढताना तहसिलदार, तलाठी, मंडळ अधिकारी यांनी गरीब लोकांच्याच गायरान गुरचरण शेतीवरील अतिक्रमण काढले. तथापि, या अधिकाऱ्यांनी तालुक्यातील विटवा, संगवे या गावांचे सुमारे ४० ते ५० एकर गायरान गुरचरण जमिनीवरील अतिक्रमण काढले नसल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगांव जिल्ह्यातील शासकीय / गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमित करण्याबाबत निर्णय घेण्यांसदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

रावेर तालुक्यातील गायरान जमिनीवर शेती प्रयोजनार्थ १२ गावांमध्ये केलेल्या अतिक्रमणांपैकी ८ गावांमधील शेती प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमण काढण्यात आलेले आहे.

(३) हे खरे आहे.
(४) जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यात एकूण २७ गावामध्ये ३४४.४५ हे.आर. इतके गायरान जमिनीचे क्षेत्र असून त्यापैकी १२ गावांमध्ये गायरान जमिनीवर शेती प्रयोजनार्थ एकूण ६८.१३ हे.आर. इतक्या क्षेत्रावर अतिक्रमण करण्यात आलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. २/२०२२ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ०६.१०.२०२२ च्या आदेशानुसार, गायरान जमिनीवरील अतिक्रमणे वर्षाअखेर निष्कासित करण्याबाबतचा कृती आराखडा करण्यात आला होता. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या कालबध्द कृती आराखडयानुसार, सदर १२ गावापैकी ०८ गावांमधील शेती प्रयोजनार्थ असलेले अतिक्रमण दिनांक २३.११.२०२२ ते दिनांक २६.११.२०२२ या कालावधीत काढण्यात आलेले आहे. उर्वरित ०४ गावांमधील अतिक्रमण काढण्याची

कार्यवाही प्रगतीत असताना, मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.०२/२०२२ मध्ये दिनांक ०१.१२.२०२२, दिनांक ०६.१२.२०२२ आणि दिनांक १९.१२.२०२२ च्या आदेशान्वये अतिक्रमणे निष्काषित करण्याबाबतच्या त्यांच्या आदेशास सद्य:स्थितीत अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यानुषंगाने मा. उच्च न्यायालयाचे जे आदेश प्राप्त होतील त्यानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल. सद्य:स्थितीत सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) अशी बाब नाही.

-----------------

**चंद्रपूर वनपरिक्षेत्रातील बांबू तोडीची कामे करणाऱ्या मजूरांची होत असलेली फसवणूक**

**(७) * ६३७०० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर वनपरिक्षेत्रातील बफर झोनमधील निंबाळा, चक निंबाळा, मामला, झरी, पेठ यासह अनेक गावातील मजूर मागील तीन महिन्यांपासून बांबू तोडणीचे काम करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांबू तोडणीचा शासकीय दर २४ रुपये ३२ पैसे प्रति बंडल असतानासुध्दा बांबू तोड मजूरांना १५ ते १६ रुपये देऊन त्यांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याची माहिती माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय नियमानुसार मजूरांचा पगार त्यांच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक असतानासुध्दा या ठिकाणी वन विभागाच्यावतीने रोखीने मजूरी देऊन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
चंद्रपूर वनपरिक्षेत्रांतर्गत बांबु तोडीची कामे दिनांक माहे नोव्हेंबर, २०२२ पासुन सुरु करण्यात आली आहे.
(२) व (३) वेतन मंडळ गडचिरोली व चंद्रपूर यांचेकडील लांब बांबु व बांबु बंडल्स करिता निष्कासन मजुरीचे दर वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचेकडील दिनांक १४.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये ठरविण्यात आले असून, लांब बांबू (वर्ग-४/५) करिता तोडीचा दर हा रुपये ५.५२ प्रती बांबू याप्रमाणे असून, बांबू बंडल्स करिता रुपये २४.३६/- प्रती बंडल्स प्रमाणे दर निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार मजूरीची रक्कम संबंधितांच्या बँक खात्यामध्ये वाटप करण्यात येते.
(४) व (५) उपसंचालक (बफर) यांचेकडे याप्रकारची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार सहाय्यक वनसंरक्षक जंकास-२ यांनी तक्रारीची चौकशी केली असून, सदर तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे दिसून आले.

-----------------

**बुलढाणा जिल्ह्यात गुरांमध्ये "ब्लड प्रोटोझुआ" आजार वाढत असल्याबाबत**

**(८) * ६२७९३ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात “लंपी” आजारापेक्षाही घातक असा जीवघेणा “ब्लड प्रोटोझुआ” आजार गुरांमध्ये वाढत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घातक आजाराने आतापर्यंत १० दुधाळ जनावरे दगावली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत गुरांची योग्य ती तपासणी करून वेळेत उपचार करण्याबाबत स्थानिक पशुसंवर्धन विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त आजाराबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) दिनांक ०३.०२.२०२३ रोजीच्या एका वर्तमान पत्रामध्ये चिखली तालुक्यातील जनावरे “ब्लड प्रोटोझुआ” आजाराने दगावत असल्याबाबतची बातमी प्रसिध्द झालेली होती.

सदर बातमीच्या अनुषंगाने जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय बुलढाणा तसेच, पंचायत समिती, चिखली येथील पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यांनी भेट देवून चौकशी केली असता, जनावरांमध्ये असा आजार झाल्याचे आढळून आले नाही. तसेच, जिल्हयातील इतर तालुक्यांमध्ये देखील कोठेही हा आजार जनावरांमध्ये आढळून आलेला नाही.

-----------------

## कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यात रिलायन्स सिमेंट कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत बेकायदेशीर चुनखडीचे उत्खनन केल्याबाबत

**(९)** * **६२४३६ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यात रिलायन्स सिमेंट कंपनी प्रा.लिमिटेड यांनी चुनखडी उत्खननासाठी परसोडा व परिसरातील सात गावातील जमिनीचे अधिग्रहण कायद्यानुसार न करता एजंटमार्फत खूपच कमी दरात जमिनी खरेदी करुन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीने भूसंपादनाविना शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत चुनखडीचे उत्खनन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) उदयोग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०४.०१.२०१८ व दिनांक १३.०६.२०१८ चे आदेशान्वये मौजा. परसोडा, कोठोडा (खुर्द), कोठोडा (बुजूर्क), गोविंदपुर, ता.कोरपना, जि.चंद्रपुर येथील ७५६.१४ हे.आर. एवढया क्षेत्रावरील चुनखडी या प्रमुख खनिजाचा पट्टा रिलायन्स सिमेंट कंपनी लि. या कंपनीला देण्यात आला आहे.

रिलायन्स सिमेंट कंपनी लि. ने खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करणेबाबत किंवा भूसंपादन अधिनियम, २०१३ अन्वये जमीन संपादन करणेबाबत भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांना सादर केलेला नाही.

रिलायन्स सिमेंट कंपनी लि. यांनी Mineral Concession Rule १९६० Part VIII, "The Covenants of the State Government" मधील उपनियम २, "Acquision of land of third parties and compensation thereof" व Mineral (Other than Atomic and Hydrocarbons energy minerals) Concession Rule २०१६ मधील नियम १२ उपनियम (s) नुसार खाणमालक (लिलावधारक) यांनी लिलाव क्षेत्रातील जमीनीचे संपादन जमीन मालकाशी आपसी वाटाघाटीने जमीन खरेदी करणेबाबत परस्पर खरेदी व्यवहार केलेला आहे. यामध्ये परसोडा, कोठोडा (खुर्द), ता.कोरपना, जि.चंद्रपुर येथील एकूण ३३.२५ हे.आर.इतकी जमीन खरेदी केली आहे. खरेदी बाबत फसवणूक झाली असल्याबाबतची कुठलीही तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पोलीस यंत्रणा यांचेकडे खातेधारकांनी केलेली नाही. सदर जमिनी मधून ५५५० टन इतक्या चुनखडीचे उत्खनन केले असुन ३६५.९७ इतक्या चुनखडीचे निर्गमन केले आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**वरुड-उमरखेड (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील संत्रा फळ प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत**

**(१०) * ६३२९९ श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे अत्याधुनिक संत्रा प्रक्रिया प्रकल्प मंजूर करण्यात येत असल्याचे तसेच उमरखेड (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी सिट्रस इस्टेट योजनेंतर्गत प्रकल्प प्रस्तावित करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत संत्रा फळ पिकांच्या कलमा तयार करणे ते मार्केटींग करणे, शेतकऱ्यांना सर्व तांत्रिक माहिती देण्याचे प्रशिक्षण देणे, प्रयोग शाळेत पाने, उती, जमीन व माती तपासणे इत्यादी विविध कार्यक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरुड येथील प्रकल्प मंजूरीनंतर विदर्भ ॲग्रो व्हिजन प्रोड्युसर कंपनीमार्फत संत्रा प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण करण्यात येऊन मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी व्यवहार्यता अहवाल (फिजीबिलिटी रिपोर्ट) सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उमरखेड येथील प्रकल्पासाठी कृषी अधिकारी, अमरावती यांना प्रकल्प राबविण्याकरिता १०० एकर जागा व शासनाकडून निधी देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे तथापि, सदर प्रकल्प कार्यान्वीत होण्यासाठी अद्यापपर्यंत योग्य ती कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अमरावती जिल्ह्यातील उपरोक्त दोन्ही प्रकल्प कार्यान्वित करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संचालक मंडळ सभा क्र.१४६, दिनांक १२.०८.२०२१ मधील ठराव क्र.११ अन्वये संत्रा प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी फिजिबिलीटी रिपोर्ट तयार करणेसाठी सल्लागार नियुक्त करुन फिजिबिलीटी रिपोर्ट तयार करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी ग्रँट थॉर्टन भारत एल.एल.पी. या कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कंपनीने स्टेकहोल्डर्स यांचेसोबत बैठका घेऊन तसेच विविध प्रकारे

अभ्यास करुन फिजिबिलीटी अहवालाचा मसूदा पणन मंडळाला सादर केला आहे. सदरचा अहवालाचा मसूदा काही बदल किंवा दुरुस्त्या सुचविणेकरिता पणन विभागास प्राप्त झाला असून तो शासन स्तरावर विचाराधीन आहे. तसेच जिल्हा मध्यवर्ती फळरोपवाटिका, उमरखेड, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे सिट्रस इस्टेट स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) वरुड येथे संत्रा प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी फिजिबीलीटी रिपोर्ट पणन विभागास प्राप्त झाला असून तो विचाराधीन आहे. तसेच जिल्हा मध्यवर्ती फळरोपवाटिका, उमरखेड, ता.मोर्शी, जि. अमरावती येथे सिट्रस इस्टेट स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून पुढील आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(६) प्रश्न उदभवत नाही

-----------------

## नांदगाव (जि.नाशिक) वनपरिक्षेत्रातील भादुरी वन परिमंडळात "राखीव वन" जमिनीची परस्पर खरेदी-विक्री केल्याबाबत

**(११) * ६११४५ श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) वनपरिक्षेत्रातील भादुरी वन परिमंडळातील मौजे डॉक्टरवाडी येथील ३०० एकर (११९ हेक्टर) राखीव वन जमिनीची परस्पर खरेदी-विक्री करण्यात येऊन त्या जागेवर अनधिकृतरित्या बांधकाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे डॉक्टरवाडी (जुनी बाभुळवाडी) (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील सर्व्हे नं.१० (सध्याचा गट क्र.२६) या राखीव वनजमिनीची बेकायदेशीररित्या विक्री झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात ७/१२ वर राखीव वने अशी स्पष्ट नोंद असलेल्या भोगवटादार वर्ग-२ / नविन अविभाज्य शर्तीची जमिनीची विक्री करताना केंद्र शासनाची व मा.सर्वोच्च न्यायालयाची परवानगी घेणे बंधनकारक असतानाही अशी परवानगी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी पूर्व वनविभागाचे उपवनसंरक्षक यांनी वनपरीक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक यांना निलंबित केले असून चौकशी करण्याची विनंती जिल्हाधिका-यांना पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) त्याचप्रमाणे उपवन संरक्षक यांनी याबाबत तक्रार केली असता जमिनीची परस्पर विक्री करुन टी.पी.सौर्य.लि. अशी जमिनीची मालकी लावणाऱ्यांच्या विरोधात व खरेदी करणाऱ्यांच्या विरोधात भारतीय वनसंवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त जमीन सन १९६३ या कालावधीपासून नॉन फोरेस्ट करून वाटप करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, याप्रकरणी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यामार्फत चौकशी सुरु करण्यात आली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार "राखीव वन" जमिनीची विक्री करणाऱ्यांवर व अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३), (४), (५) व (६) वन विभागाकडील अभिलेख तपासले असता द बॉम्बे गर्व्हमेंट गॅझेट (अधिसूचना) क्रमांक ८८९१ डी दिनांक २१ डिसेंबर, १८९९ अन्वये मौजे बाभुळवाडी, ता.नांदगाव सर्व्हे नं. १० क्षेत्र ८८९ एकर ७ गुंठे व सर्व्हे नंबर १६ क्षेत्र ८९५ एकर २६ गुंठे असे एकुण १७८४ एकर ३३ गुंठे क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १८७८ चे कलम ७ अन्वये राखीव वन घोषित झालेले आहे. तद्नंतर द बॉम्बे गर्व्हरमेंट गॅझेट (अधिसूचना) क्रमांक ५०२०, दिनांक ३ जुन १९१० अन्वये क्षेत्र मौजे बाभुळवाडी, ता.नांदगाव सर्व्हे नंबर १० पैकी व १६ पैकी ११४७ एकर २१ गुंठे क्षेत्राचे निर्वनीकरण झालेले आहे. सबब, मौजे बाभुळवाडी, ता.नांदगांव येथील शिल्लक ७६२ एकर १६ गुंठे क्षेत्र "राखीव वन" आहे.

महसूली अभिलेखानुसार सन १९८७ साली मौजे बाभुळवाडीचे विभाजन होऊन "बाभुळवाडी व डॉक्टरवाडी" अशी स्वतंत्र महसूली गावे तयार झाली आहेत. "कडई पत्रकानुसार" सर्व्हे नं १० ची ४६४ एकर सरकारी फॉरेस्ट ही जमीन डॉक्टरवाडी गावामध्ये समाविष्ट झाली असून तदनंतर सर्व्हे नं. १० हा डॉक्टरवाडी गावामध्ये गट नं. २६ झाला आहे. प्रस्तूत गट नं. २६ ला "महाराष्ट्र शासन राखीव वन" अशी नोंद असून त्याचे क्षेत्र १८८.१५ हेक्टर असे दर्शविले आहे.

तहसिलदार, नांदगाव यांच्या कार्यालयाकडील - Register showing the information reg. Forest land, waste land, Gairan land in Nandgaon Taluka या नोंदवहीमध्ये वन विभागाकडून हस्तांतरीत झालेल्या जमीनी व त्यापैकी वहितीकामी वितरीत झालेल्या जमिनीसंदर्भात विवरण नमूद आहे. सदर वितरीत क्षेत्रापैकी सर्व्हे नं. १० पैकी एकूण क्षेत्र १७९ एकर २७ गुंठे ही जमीन मिळकत अधिकार अभिलेखात दाखल फेरफार नोंद क्र. २० दिनांक २.१२.१९७१ नुसार श्रीकृष्ण कलेक्टीव्ह फार्मींग सोसायटीस देण्यात आली आहे. सदर वाटपाचे फेर फार नोंद क्र. २० पाहता निर्वनीकरण होऊन सदर वाटप झाल्याचा स्पष्ट उल्लेख त्यात आहे. तथापि, महसूली विभागाच्या अभिलेख कक्षात वाटप क्षेत्राचे निर्वनीकरणाबाबतचे राजपत्र आढळून आलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात दुर्लक्ष केल्याकारणाने उप वनसंरक्षक (पुर्व), नाशिक यांनी वन परिक्षेत्र अधिकारी, नांदगांव प्रादेशिक, वनपाल, तळवाडे व वनरक्षक, तळवाडे यांना निलंबित केले असून वनजमिनींची खरेदी विक्रीस परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना विनंती केली आहे.

तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी, नांदगांव प्रादेशिक यांच्याकडील रेंज गुन्हा क्र. M०१/२०२२-२३, दिनांक २१.१.२०२३ अन्वये टी.पी.सौर्य या कंपनी विरुद्ध राखीव वन जमिनीवर अतिक्रमण केल्याबद्दल भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत गुन्हा नोंदविला असून तपास सुरु आहे.

(७) अपर जिल्हाधिकारी, मालेगाव यांनी दिनांक ३०.१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उप वनसंरक्षक (पूर्व), नाशिक यांना अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात निर्वनीकरणाबाबतचे राजपत्र महसूल अभिलेखांमध्ये तुर्तास आढळून येत नसल्याने, वाटप झालेल्या प्रश्नांकित क्षेत्राच्या निर्वनीकरणाबाबत निश्चित भाष्य करता येत नसल्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

वन विभाग व महसूल विभाग यांच्या अहवालात मतांतर आढळून येत असल्याने वाटप करण्यात आलेल्या क्षेत्राच्या अनुषंगाने चौकशी करण्यास्तव मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक यांनी विभागीय वन अधिकारी (दक्षता), नाशिक यांच्या अध्यक्षेतखाली दिनांक २१.२.२०२३ अन्वये चौकशी समितीची नियुक्ती केली आहे.

(८) प्रश्न उदभवत नाही.

----------------

## सातपूर (जि.नाशिक) परिसरात खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून एकाच कुटुंबातील तिघांनी केलेली आत्महत्या

**(१२) * ६२२३७ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर (जि.नाशिक) परिसरात खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून एकाच कुटुंबातील तिघांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरात मागील दीड महिन्यात खाजगी सावकारीमुळे पाच लोकांनी आत्महत्या केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींविरुद्ध कोणती कारवाई करण्यासंदर्भांत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२) व (३) सातपूर (जि. नाशिक) येथे तीन जणांनी खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून गळफास घेवून आत्महत्या केल्यासंदर्भात सातपूर, पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. २२/२०२३ सह महाराष्ट्र सावकारी अधिनियम, २०१४ चे कलम ३९ व ४५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकूण २१ अवैध सावकारांपैकी १० सावकारांना न्यायालयीन कस्टडी देण्यात आली असून ७ सावकारांना जामीन मंजूर झाला आहे व उर्वरीत ४ सावकारांचा शोध सुरु आहे.

तसेच नाशिकरोड भागामध्ये दोन सख्या भावंडानी विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे दिनांक ०५.०२.२०२३ रोजी निदर्शनास आले. त्यानुषंगाने उपनगर, पोलीस स्टेशन, नाशिक येथे गुन्हा क्र.५१/२०२३ दाखल करण्यात आला असून पोलीसांमार्फत तपासाची कार्यवाही सुरु आहे. तथापि सदर प्रकरणामध्ये दाखल एफ.आय.आर. चे अवलोकन केले असता सावकारी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्याचे निदर्शनास येत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यात शासकीय कब्जे हक्काच्या जमिनीचे रुपांतरण मालकी हक्कामध्ये करण्याच्या प्रिमियम योजनेबाबत

**(१३) * ५७२७९ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१९ च्या सुरुवातीला तत्कालीन शासनाने शासकीय कब्जे हक्काच्या जमिनीचे रुपांतरण मालकी हक्क किंवा फ्री होल्डमध्ये करण्यासाठी प्रिमियम योजना जाहीर करुन त्याअंतर्गत जमिनीच्या वेगवेगळ्या संवर्गासाठी १०, १५ व २५ टक्के प्रिमियम आकारण्याची तरतूद केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेची मुदत तीन वर्षापर्यंतची असल्यामुळे दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास योजनेची मुदत संपली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कब्जे हक्काच्या २० हजारांहून अधिक जमिनी निवासी सोसायटयांना देण्यात आल्या असून त्यामध्ये मुंबईत तीन हजार सोसायट्या या जमिनीवर असून योजनेच्या काळात केवळ ५० हून कमी जमिनीचे हस्तांतरण झाल्याचे तसेच या इमारतीमधील सदनिकांधारकांच्या हस्तांतरण शुल्क आणि अनेक जाचक अटीमुळे सोसायटयांचे अद्याप हस्तांतरण झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त योजनेला आणखी दोन वर्षांची मुदतवाढ द्यावी असा प्रस्ताव तत्कालीन शासनाने तयार केल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या मुदतवाढीच्या प्रस्तावाबाबत तसेच प्रिमियमची रक्कम ५ टक्के करावी या सदनिकांधारकांच्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) शासनाने कब्जे हक्काने भोगवटादार वर्ग-२ च्या धारणाधिकारावर अथवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या धारणाधिकाराचे वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्याकरीता दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजी नियम केलेले आहेत. या नियमांनुसार संबंधित जमिनीचे प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील दरानुसार येणाऱ्या मूल्यांकनाच्या प्रयोजन निहाय ६०% ते ७५% अधिमूल्य आकारुन वर्ग-१ मध्ये रुपांतरणाची तरतूद आहे. तथापि, अशा अधिमुल्याच्या दराने ३ वर्षाच्या कालावधी करीता म्हणजेच ०७ मार्च, २०२२ पर्यंत सवलतीचे दर १०% ते २५% पर्यंत आकारलेले आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन दिल्याबाबतची मुंबई उपनगर जिल्हयात कब्जेहक्काची ७१९ तर भाडेपट्टयाचे एक प्रकरण आणि मुंबई शहर जिल्हयात सुमारे १८ भाडेपट्टयाची प्रकरणे आहेत. गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका हस्तांतरणांबाबत हस्तांतरण शुल्क आकारणेबाबत शासनाने वेळोवेळी धोरण विहीत केलेले आहे. त्यानुसार सदनिकांच्या हस्तांतरणासाठी अथवा हस्तांतरण नियमानुकूल करण्याकरीता हस्तांतरण शुल्क भरणे आवश्यक आहे.

तसेच, भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीच्या भोगवटादार वर्ग-१ मधील रुपांतरणासाठी आकारावयाच्या अधिमुल्यांच्या वरील सवलतीच्या दरांना दिनांक ०७ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यास राज्य मंत्रीमंडळाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मौजे गिरगाव (ता.सेलू, जि.परभणी) येथील वाटूर-मंठा-चारठाणा या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी कंत्राटदाराने अतिरिक्त ब्रास मुरुम उत्खनन केल्याबाबत

**(१४) * ६३२२८ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गिरगाव (ता.सेलू, जि.परभणी) येथील वाटूर-मंठा-चारठाणा (NH-७५२-I) या महामार्गाच्या कामासाठी कंत्राटदार कंपनीने येथील साठवण तलाव व तलावा व्यतिरिक्त १० एकर जमिनीतून ५ हजार ब्रास मुरूम उत्खनन करण्याची परवानगी घेतली असताना प्रत्यक्षात मात्र या दोन्ही ठिकाणाहून एक लाख ब्रास पेक्षाही अधिक मुरूम उत्खनन करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे पिंपरखेडा खराबे (ता.मंठा) येथील शेतकरी श्री.दत्तराव खराबे (व इतर दोन शेतकरी) यांच्या अंदाजे १० एकर शेत जमिनीतील २ हजार ब्रास मुरूम उत्खनन करण्याची परवानगी घेतली असताना प्रत्यक्ष मात्र ५० हजार ब्रास पेक्षाही जास्त मुरूम उत्खनन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर महामार्गाच्या कामासाठी वापरण्यात आलेला दगड विनापरवानगी अवैधरित्या उत्खनन केलेला असून याबाबत तक्रार केल्यानंतर दगड उत्खननाची परवानगी घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त महामार्गाच्या कामासाठी संबंधित कंत्राटदार कंपनीने मौजे नांदगाव (जि. परभणी) शिवारात खडी क्रशर केंद्र उभारले असून यासाठी गौण खनिज विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून आवश्यक असलेल्या परवानग्या घेतलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त उत्खनन महसूल यंत्रणेतील जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी व कंत्राटदार कंपनीच्या संगनमताने झाले असून त्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कंत्राटदार कंपनीवर तसेच संबधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मौजे पिंपरखेडा खराबे, ता.मंठा येथील जागेमधून ई.टी.एस. मोजणीनुसार ९१५४.२४ ब्रास उत्खनन झाल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे. परंतु, संबंधित कंपनीला जिल्ह्यातुन ८५०० ब्रास मुरूम उत्खननाची परवानगी देण्यात आलेली आहे. याबाबत अतिरिक्त उत्खनन ६५४.२४ ब्रास आढळून आलेले असल्याने संबंधित कंपनीला जास्तीच्या गौण खनिज उत्खननापोटी / वापरापोटी वाढीव स्वामित्वधनाची रक्कम ३० दिवसात शासन जमा करण्याचे कळविण्यात आलेले आहे.
(३), (४), (५) व (६) हे खरे नाही.

मौजे नांदगांव येथील गट क्र. ५४/१४९ या गटामध्ये संबंधित कंपनी यांच्या स्टोन क्रेशरला महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने दिनांक २८.०३.२०२२ रोजी Consent to Establish ०५ वर्षाकरिता परवानगी दिलेली आहे. त्यानुसार सदरील स्टोन क्रशरला दिनांक ३०.११.२०२२ पर्यंत चालविण्यास नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. तद्नंतर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने दिनांक २६.०७.२०२२ रोजी Consent to Operate दिनांक ३१.०५.२०२४ या कालावधी पर्यंत परवानगी दिलेली आहे. अर्जदार आर.बी.घोडके यांच्या विनंती अर्जावरुन या कार्यालयाचे आदेश जा.क्र.२०२२/महसूल/गौख कावी-८० दिनांक १४.१०.२०२२ अन्वये सदरील स्टोन क्रेशरला दिनांक ३१.०५.२०२४ पर्यंत स्टोन क्रेशर चालविण्याचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
सदर क्रशरकरिता दगड पुरवठा मौजे नांदगाव येथील गट क्रमांक ४८ मध्ये मंजुर खाणपट्टाधारक यांच्या सोबत ०६ महिन्यासाठी दगड उत्खनन करुन नेण्याचा करारनामा केल्यानुसार ५००० ब्रासचे ३० लाख रुपये भरणा केलेला आहे. त्यानंतर त्यांनी त्यांच्या स्वतःच्या मौजे नांदगांव येथील गट क्र.४८ मधील क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर जमिनीसाठी मायनिंग प्लॅान व पर्यावरण अनुमती सादर केल्यामुळे दिनांक १४.१०.२०२२ नुसार दिनांक ३०.०९.२०२६ पर्यंत मुदतीसाठी खाणपट्टा मंजुर केला असुन सदर खानपट्ट्यासाठी दगडाचे १२००० ब्रासचे व मुरुमाचे ५००० ब्रासचे स्वामित्वधन रुपये १,०२,००,०००/- भरणा केलेले आहे.

-----------------

## आंबिवली-कल्याण (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील पुणे-बडोदा रस्ता महामार्ग प्रकल्पाकरिता केलेल्या भूसंपादनात झालेला आर्थिक गैरव्यवहार

**(१५) * ५८९६९ श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील आंबिवली-कल्याण भागातून जाणाऱ्या पुणे-बडोदा रस्ता महामार्ग प्रकल्पाकरिता केलेल्या भूसंपादनात येथील सर्व्हे नं.३/४, या मिठाईवाल्याच्या भूखंडावर खोट्या कागदपत्रांच्या सहाय्याने साजिद शरफुद्दीन रईस यांनी पार्टनरशिपमध्ये मालकीच्या चाळी दाखवून फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोट्या कागदपत्राद्वारे महसूल तसेच रस्ते विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांबरोबर आर्थिक संगनमत करुन २ कोटी ८ लाख ६० हजार ४७६ रुपये शासकीय निधी घेवून आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भूखंड संपादन व मोबदला गैरव्यवहाराप्रकरणी प्रांत अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रार अर्जानुसार चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासकीय निधी घेणाऱ्या बोगस जमीन मालकावर कारवाई करुन निधी वसूल करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली तसेच संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी श्री. शाहीद मिठाईवाला यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कल्याण यांनी चौकशी केली असून सदर तक्रारीत तथ्य आढळून आलेले नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये भुयारी गटार योजनेच्या ठेकेदाराने मातीची बेकायदेशीर वाहतूक करून स्वामीत्वधन बुडविल्याबाबत

**(१६) * ५७६१९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे कोपरीगाव तालुका गट क्र.८६ मध्ये ठेकेदार मे.एन.सी.सी. व एस.एम.सी. यांनी बांधकाम करण्यासाठी हजारो ब्रास मातीचा भराव केला असून त्याचे स्वामीत्वधन (रॉयल्टी) बुडविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुयारी गटार योजनेच्या कामाचे ठेकेदार आनंद कंस्ट्रवेल यांनी उत्खनन करून पुन्हा भरणी केली व शिल्लक राहिलेल्या विनापरवाना मातीची वाहतूक करून सुमारे ४,६५२ ब्रास मातीच्या वाहतुकीपोटी ४ कोटी ८३ लाख ८० हजार ८०० रुपये स्वामीत्वधन (रॉयल्टी) बुडविल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुयारी गटार योजनेच्या कामाचे ठेकेदार मे.इंगल कन्स्ट्रक्शन, मे.अथर्व कन्स्ट्रक्शन, मे.शापूरजी पालोनजी आणि के.आय.पी.एल कन्स्ट्रक्शन व मे-जिप्सम स्ट्रक्चरल ई.प्रा.लि. या कंपन्याच्या ठेकेदारांनी शासनाच्या कोणत्याही परवानगी न घेता अनधिकृतपणे उत्खनन व वाहतूक करुन शासनाची कोटी रुपयांची रॉयल्टी बुडविल्याने लोकआयुक्त आणि उपलोक आयुक्त यांनी दंडासहित रुपये ४३ कोटी ५० लाख रॉयल्टी वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाच्या जे.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम करणारे ठेकेदार महावीर रोडस इंफ्रा, रामकी, स्वस्तिक इन्फ्रा, गोरूर इंफ्रा प्रोजेक्ट (जे.व्ही), मे.के.आर.सी. सिनोमेण जी.ए.(जेव्ही),

मे.आर.बी.कृष्णानी व मे.एस.एस.एस.विश्वा (जेव्ही) या ठेकेदारांकडून स्वामीत्वधनाची रक्कम व दंड अशी एकूण ३० कोटी रक्कम वसूल करण्याकरिता मा.आयुक्त ठाणे महानगरपालिका यांना दिनांक ६ जून, २०१९ रोजी मा.अवर सचिव, नगरविकास विभाग यांनी आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन स्वामीत्वधन व दंड वसुलीसंदर्भात तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अशा आशयाची तक्रार प्राप्त असून, सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे.

(२) व (३) मा.उप लोक आयुक्त यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील भुयारी गटार योजनेच्या कामासंदर्भात गौण खनिज उत्खननकरीता स्वामित्वधनाची व दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, मा.उप लोक आयुक्त यांनी या प्रकरणात नियमानुसार व न्यायालयीन आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना कळविले आहे.

ठाणे महानगरपालिकेकडून केंद्र व राज्य शासनाच्या आर्थिक सहकार्यातून जेएनएनयु आरएम अंतर्गत भुयारी गटार योजना प्रकल्पासाठी संबंधित पाच कंपन्यास कंत्राटे देण्यात आलेली आहेत. संबंधित कंपन्यापैकी ०२ कंपन्यांनी रुपये २,१६,२६,८६६/- एवढ्या रकमेचे स्वामित्वधन शासन जमा केले आहे. उर्वरीत तीन कंपनीस महानगरपालिका, ठाणे यांच्याकडून दिनांक ३०.०९.२०१९ अन्वये स्वामित्वधन भरण्याबाबत नोटीस देण्यात आल्या असता, संबंधित कंपन्यानी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.१४२९/२०२०, १४३०/२०२० व ६८९/२०२१ अन्वये सदर नोटीसा आव्हानित केल्या. मा.न्यायालयाने रिट याचिका क्र.१४२९/२०२० व १४३०/२०२० मध्ये दिनांक १३.०२.२०२० च्या आदेशान्वये महानगरपालिका, ठाणे यांनी दिलेल्या दिनांक ३०.०९.२०१९ संबंधित कंपनीस देण्यात आलेल्या नोटीसा रद्द केल्या आहेत.

तर मा.न्यायालयाने रिट याचिका क्र.६८९/२०२१ संबंधित कंपनीने योग्य त्या प्राधिकरणाकडे म्हणजे जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे अर्ज केल्याच्या पश्चात योग्य तो आदेश पारित करण्याचे आदेश दिले त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे या प्रकरणी सुनावणी सुरु आहे.

(४), (५) व (६) संबंधित कंत्राटदाराकडुन तातडीने संपूर्ण स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्याबाबत दिनांक ०६.०६.२०१९ च्या पत्रान्वये आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना कळविली आहे. त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## गेवराई (जि.बीड) शहरांमध्ये बोगस गुंठेवारी करुन खरेदीखत केल्याबाबत

**(१७) *५९५०१ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) गेवराई (जि.बीड) शहरांमध्ये बोगस गुंठेवारी करणाऱ्या भूमाफियांनी तब्बल ३२ खरेदीखत केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका खाजगी शिक्षण संस्थेतील शिक्षक प्रत्येकी रुपये ६०,०००/- घेऊन उपविभागीय अधिकाऱ्यांची सही व शिक्का मारून गुंठेवारी करून देत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेवराई शहरांमध्ये भूमाफियांचे रॅकेट तयार झाले असून अधिकाऱ्यांच्या संगनमताने भूमाफिया शहरातील काही ठिकाणचा लेआउटचा नकाशा बदलून मोकळया जागांवर कब्जा करत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोगस खरेदीखत करणाऱ्या ३२ लोकांवर गुन्हे दाखल करण्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांचे दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आदेश असताना आजतागायत त्यांच्यावर गुन्हे नोंद झाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाचा महसूल बुडविणाऱ्या व शहरात दहशत निर्माण करणाऱ्या या भूमाफियांना कायमची जरब बसवण्यासाठी संबंधित प्रकरणातील शिक्षक व त्याकरिता सहकार्य करणारे प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर मोका अंतर्गत गुन्हा नोंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

उपविभागीय अधिकारी, बीड यांचे कार्यालयाकडून ३२ दस्तातील गुंठेवारी व अकृषक आदेश निर्गमित झालेले नसून ते बनावट सही व शिक्क्याचा वापर करुन निर्गमित केल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) गेवराई शहरातील मोकळया जागांबाबत शहरातील कोणत्याही लेआऊटच्या नकाशामध्ये बदल करण्यात आलेला नाही.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी बोगस खरेदीखत करणाऱ्या अपचाऱ्याविरुध्द पोलीस स्टेशन गेवराई येथे गु.र.नं.२४/२०२३ अन्वये दिनांक १४.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उक्त ३२ आदेशांपैकी ३ फेरफार यापूर्वीच नामंजूर करण्यात आले होते व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५७ अन्वये सदरील बनावट गुंठेवारी / अकृषिक आदेशान्वये मंजूर झालेले २९ फेरफार उपविभागीय अधिकारी, बीड यांच्या दिनांक १०.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील विविध वन परिक्षेत्रात वन्य प्राण्यांच्या मृत्यूत झालेली वाढ

**(१८)** * **६०५९१ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील विविध वनपरिक्षेत्रात पट्टेदार वाघ, जंगली मोर तसेच निलगायी यासह बहुतांश वन्य प्राण्यांच्या मृत्यूच्या संख्येत वाढ होत असल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मृत्यू नैसर्गिक, अपघाती तसेच शिकार यामुळे होत असून काही ठिकाणी वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मानवी मृत्यू होण्याचे प्रमाणही वाढल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन्य प्राण्यांच्या मृत्यू प्रकरणी सविस्तर चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल वन विभागाकडून शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वन परिक्षेत्रात वाढलेले जंगली प्राण्यांचे मृत्यू तसेच प्राण्यांच्या हल्ल्यात होणारे मानवी मृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) तसेच मानवी मृत्यू प्रकरणी वाढीव आर्थिक मदत मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व चंद्रपूर (प्रादेशिक) विभागाचा समावेश होतो.

दिनांक ०१.०१.२०२२ ते दिनांक ३१.१२.२०२२ या कालावधीत नैसर्गिक कारणामुळे ९-वाघ, ३-बिबट, ६-चितळ, १-निलगाय, १-अस्वल व ५-मोर, आपसी झुंजीत २-वाघ, अपघातामुळे २-वाघ, ४-बिबट, ५-चितळ, २-निलगाय व २-अस्वल, विद्यूत प्रवाहामुळे १-वाघ, शिकारीमुळे ५-चितळ, ३-रानडुक्कर व २-सायाळ या वन्यप्राण्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात ४४ व्यक्तींचा तर बिबट्याच्या हल्ल्यात ७ व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी टाळण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वनक्षेत्रात गवत, कुरण व इतर मृद व जलसंधारणाची कामे करुन त्या ठिकाणी गवत व इतर चराई योग्य प्रजाती याची लागवड करुन वन्यजीव/ तृणभक्षी प्राण्यांसाठी कुरण निर्मिती करण्यात येते आहे.
- वन्यप्राण्यांसाठी वनक्षेत्रात कृत्रीम पाणवठे निर्माण करुन पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- अतिसंवेदशिल क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण व निरीक्षण मनोरे तयार करण्यात आले आहेत.
- वन्यजीवांच्या तात्काळ उपचारांसाठी वन्यजीव बचाव केंद्र, प्राथमिक उपचार केंद्र तयार करण्यात आली आहेत.
- विद्युत प्रवाहामूळे वाघांचे व अन्य वन्य प्राण्यांचे मृत्यू होऊ नये म्हणून वनविभाग व म.रा.वि.वि. महामंडळ मिळून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांदवारे सनियंत्रण करण्यात येते.
- राज्यातील वन्यप्राण्यांबाबत गुन्हे प्रकरणांची अद्यावत माहिती ठेवणे, करीता वन्यजीव गुन्हे कक्ष Wildlife Crime Cell प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर येथे तयार करण्यात आला आहे व सदर कक्षाचे बळकटीकरण करण्यात येत आहे.
- अतिसंवेदशिल क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके तयार करण्यात आले असून त्याद्वारे, येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करण्यात येते.
- वन्यजीव गुन्ह्यासंबंधात माहिती संकलित करण्याकरीता खबऱ्याला बक्षिस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद केलेली आहे.

मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राणी व त्यांच्या हालचालीबाबत सनियंत्रण करुन गावामध्ये त्याबाबात जनजागृती करण्यात येते.
- संवेदनशिल क्षेत्रात प्राथमिक बचाव गटाची निर्मिती करण्यात आली आहे.
- मानवी जिवितास हानी पोहचविणाऱ्या वन्यप्राण्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतुदीचा अवलंब करुन जेर बंद करण्यात येते.
- अभयारण्या लगतच्या २ कि.मी. परीसरातील गावे / व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्रातील गावे, व्याघ्र भ्रमण मार्गातील गावांची डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनांतर्गत निवड करुन आतापर्यंत १२८७ गावांमध्ये वनावरील अवलंब कमी करणे, पर्यायी रोजगार निर्माण करणे, इत्यादी कामे घेण्यात आली आहेत.

(५) हे खरे नाही.

वन्यप्राण्यांपासून झालेल्या हानीसाठी नुकसानभरपाई (२४०६ २३६६) या लेखाशिर्षांतर्गत प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्याकरीता क्षेत्रिय स्तरावर उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे जेणेकरुन अनुदान उपलब्धतेची वाट न पाहता तात्काळ अर्थसहाय्य अदा करणे शक्य

होते. तसेच मानवी मृत्यू प्रकरणी शासनाने दिनांक २३.०८.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार वाढ करुन रुपये २०.०० लक्ष अर्थसहाय्य निश्चित केले आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात न्यायालयाने निकाल दिल्यानंतरही महसूल प्रशासन नोंदी घेण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबत

**(१९) * ५७३१८ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या मिळकतीची वाटणी होऊन इतर वारसदारांना मिळकत प्राप्त होणे व कुटुंबातील सदस्यांमध्ये झालेल्या तडजोडीनुसार पारित केलेल्या वाटपाच्या व घोषित हुकुमनाम्याच्या अनुषंगाने महसूली अभिलेखात नोंद होण्यासाठी मुद्रांक शुल्क अथवा इतर कोणतेही शुल्क आकारण्यात येवू नये असे मा.सर्वोच्च न्यायालय, यांचे सिव्हील अपील क्र. २३३६/२०२१ मधील आदेश दिनांक ०६ जुलै, २०२१ व अधिसुचना, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १४ जून, २०२१ नुसार शासनाने संबंधित महसूल विभागाला कळविण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्यायालयामध्ये कुटुंबातील सदस्यांमध्ये होणाऱ्या वाटणी पत्राचे न्यायालयीन तडजोड नामे व मालकी घोषणेचे दावे हे न्यायालयाचा निकाल दिल्यानंतरही महसूल प्रशासन नोंदी घेण्यास टाळाटाळ करीत असून न्यायालयांमध्ये झालेली कोर्ट डिक्री ही मुद्रांक शुल्क भरुन नोंदणीकृत करुन आणावी असे सांगितले जात असल्याने शेतकऱ्यांना/नागरिकांना हजारो रुपये मुद्रांक शुल्काचा आर्थिक भुर्दंड भरावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.न्यायालयाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये याबाबतच्या नोंदीचे आदेश देऊनही महसूल विभागाने यापैकी किती नोंदी नोंदणीकृत करुन दिलेल्या आहेत व प्रलंबित किती आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, महसूल विभागाकडून अशा प्रकारच्या मिळकत धारकांच्या होत असलेल्या अडवणूकीबाबत तसेच नोंदी घेण्यास कसूर करणाऱ्या संबंधीतांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
वाटपाच्या हुकुमनाम्याच्या फायलींगकरीता नोंदणी फी माफ आहे. परंतु मुद्रांक शुल्क देय आहे.
(२) कोर्ट डिक्री नोंदणीकृत करावी लागते, ही बाब खरी नाही. तथापि, वाटणीपत्रावरील मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे.
(३) नाही.
(४) शेतजमिनीची मिळकतीची वाटणी सहधारकामध्ये होत असताना महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-१ मधील अनुच्छेद ४६ प्रमाणे मुद्रांक शुल्क देय आहे. दिनांक १५/५/१९९७ पासून महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये अनुच्छेद ४६ मध्ये सुधारणा करुन शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तावर रुपये १००/- एवढे मुद्रांक शुल्क विहीत करण्यात आलेले आहे. मात्र शेजमिनीच्या विभाजनाकरिता प्राप्त अर्जाबाबत मालकी हक्काबाबत प्रश्न उदभवल्यास दिवाणी न्यायालयाच्या दरखास्ती प्रकरणानुसार अथवा तडजोडीच्या प्रकरणानुसार न्यायालयीन निर्णयाप्रमाणे

अधिकार अभिलेख अदयावत करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणी धारण जमिनीतील सहधारक व सहहिस्सेधारक व्यतिरिक्त हस्तांतरण झाले का बाबत तपासणी करुन, तपासणी अंती त्रयस्थ व्यक्तीकडे हस्तांतरण झाले असल्यास मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मुद्रांक शुल्क वसूल केल्यानंतरच फेरफार व अधिकार अभिलेख अदयावत करावेत अशा सुचना सोलापूर जिल्हयात सर्व तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या आहेत. मा.न्यायालयाकडून पारित करण्यात आलेल्या तडजोड हुकुमनाम्याची नोंदणी करुन इंडेक्स-२ ची मागणी महसूल अधिकाऱ्याकडून केली जात नाही. तथापि सदर तडजोड हुकुमनामा हा सहधारक व सहहिस्सेधारक व्यतिरिक्त व्यक्तीकडे होत असल्यास योग्य ते मुद्रांक शुल्क भरुनच त्यानंतरच महसूली अभिलेख नोंदी घेतल्या जातात.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील राष्ट्रीयकृत तसेच खाजगी बँकाचे रब्बी हंगामाच्या कृषी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्याबाबत

**(२०) * ५६५०८ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीयकृत तसेच खाजगी बँकाचे रब्बी हंगामाच्या कृषी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण झाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच परभणी जिल्ह्यात सन २०२२-२३ यावर्षीच्या रब्बी हंगामासाठी प्रशासनाने ६२४ कोटी ८० लाख रुपयांचे पीक कर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट बँकांना दिले असतानाही जिल्ह्यातील बँकांकडून केवळ २९३ कोटी ५२ लाख रुपयांचेच पीक कर्ज वाटप केल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील खरीप पीक कर्ज वितरणामध्ये घट होऊन मागील वर्षी केवळ ५० टक्के शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत, सहकारी व खाजगी बँकांनी पीक कर्ज दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच बुलढाणा जिल्ह्यात रब्बी पीक कर्ज वितरणात विलंब होत असल्याचेही माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन रब्बी कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करणेसंदर्भात तसेच या उद्दिष्टांकडे दुर्लक्ष करणाऱ्या बँक व्यवस्थापनांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) नाही.

(२) नाही. परभणी जिल्हयाअंतर्गत जि.म.स. बँका, राष्ट्रीयकृत व व्यापारी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकांसाठी सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात रब्बी हंगामासाठी रुपये ६२४.८१ कोटी पीक कर्जवाटपाचा लक्षांक असून त्या लक्षांकानुसार माहे डिसेंबर, २०२२ अखेर सदर बँकांकडून एकुण ४६,४४८ शेतकऱ्यांना रुपये ३६६.४१ कोटी रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. (लक्षांकाचे ५८.६४ %)

(३) नाही. मागील वर्षी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात खरीप पीक कर्ज वाटपाअंतर्गत परभणी जिल्हयासाठी जि.म.स बँका, राष्ट्रीयकृत व व्यापारी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँका यांना रुपये १२१३.२१ कोटी पीक कर्जवाटपाचा लक्षांक होता, त्यानुसार माहे सप्टेंबर, २०२१ अखेर सदर बँकांकडून एकुण १,०६,९२२ शेतक-यांना रुपये ७४८.८० कोटी पीक कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. (लक्षांकाच्या ६१.७२%)

(४) नाही.बुलढाणा जिल्ह्यासाठी रब्बी हंगामासाठी रुपये ६०० कोटी इतका पीककर्ज वाटपाचा लक्षांक देण्यात आला होता, त्याअनुसार माहे जानेवारी २०२३ पर्यंत रुपये ६०३.४७ कोटी पीक कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. (लक्षांकाच्या १०१%)

(५) जिल्हा प्रशासनाकडून पीककर्ज वाटपाबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री किसान योजनेचे लाभार्थी किसान क्रेडिट कार्ड व पीक कर्ज वाटपापासून वंचित असल्याबाबत

**(२१)** * **६२९४५ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील पोर्टलनुसार प्रधानमंत्री किसान योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या ४,९७,४५० एवढी असुन विविध बँकाशी प्रधानमंत्री किसान योजनेच्या लाभार्थ्यांची संलग्न संख्या ४,९३,२९६ एवढी असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांपैकी एकुण ४,९३,२९६ लाभार्थ्यांपैकी बीड जिल्ह्यात किसान क्रेडिट कार्ड व पीक कर्ज वाटपापासून २,६२,८३९ शेतकरी वंचित असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेपासून शेतकरी मोठ्या प्रमाणात वंचित राहिल्यामुळे त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकरी किसान क्रेडिट कार्ड व पीक कर्ज वाटपापासून वंचित राहू नयेत याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) नाही.

बीड जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री किसान योजनेचे एकूण ५,२७,५६१ नोंदणीकृत लाभार्थी असून आधार संलग्न बँक खाती असलेले ३,८६,५६६ लाभार्थी आहेत.

(२) सन २०२२-२३ करिता बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत/ खाजगी/ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक/ ग्रामीण बँकांना खरीप व रब्बी हंगामासाठी पीक कर्जवाटपाचा एकूण रूपये २२००.०० कोटीचा लक्षांक देण्यात आला होता. त्यापैकी २,४७,६९२ शेतकऱ्यांना २१०१.७७ कोटी (एकूण लक्षांकाच्या ९६ टक्के) एवढे पीक कर्जवाटप करण्यात आलेले आहे.

(३) नाही.

(४) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या सभेमध्ये वेळोवेळी आढावा घेऊन योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच तालुकास्तरावरील बँकर्स समितीच्या सभेमध्ये बँक / शाखांचा

वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून किसान क्रेडिट कार्ड, पीक कर्जाचे मेळावे घेऊन वंचित शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी बहुल भागात रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक वंचित लाभार्थ्यांना बेरोजगार भत्ता देण्याबाबत

**(२२) * ५६८१६ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, मोखाडा व विक्रमगड (जि.पालघर) या आदिवासी बहुल तालुक्यात २७ ग्रामपंचायती व ५६ महसूली गावे असून येथील अनेक गावात मागील वर्षभरापासून रोजगार हमी योजनेंतर्गत कामे उपलब्ध झाली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेंडक्याची वाडी (ता.मोखाडा) येथे ग्रामपंचायतीमार्फत सुमारे १४२ मजुरांना रोजगार हमी योजनेची कामे मिळत नसल्याच्या निषेधार्थ वंचित प्रत्येक बेरोजगार लाभार्थ्यांना भत्ता देण्याची मागणी श्रमजीवी संघटनेने दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रयोजनार्थ सन २०२२ ते २०२४ या आर्थिक वर्षात रोजगार हमी योजनेंतर्गत किती लाभार्थ्यांना बेरोजगार भत्ता दिला गेला वा देण्यात येणार आहे व किती मजूरांना रोजगार हमी योजनेंतर्गत कामे देण्यात आली वा देण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कामगारांना बेरोजगार भत्ता व वेळेवर मजूरांच्या हाताला काम मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) सदर नमूद निवेदन शासनाकडे प्राप्त झालेले दिसून येत नाही.
(३) सन २०२२-२३ मध्ये ५४२०७ इतक्या कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला व त्याकरिता रू.८५८५.४९ लक्ष इतका निधी मजूरी स्वरूपात त्यांचे बँक खात्यामध्ये वितरीत करण्यात आला आहे. लाभार्थ्यांना वेळेवर कामे उपलब्ध करून देता येत असल्याने बेरोजगार भत्ता देण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## लोहा व देगलुर (जि.नांदेड) तालुक्यात हजारो ब्रास मातीचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याबाबत

**(२३) * ५८७५० श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यात प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने मुरुम-मातीचे उत्खनन केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच देगलूर (जि.नांदेड) तालुक्यात रेती घाटांचा लिलाव पद्धत बंद असल्याचा फायदा घेऊन वाळू मफिया व प्रशासनातील अधिकारी यांच्या संगनमताने अवैध गौण उत्खनन सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, देगलूर तालुक्यात विशेषत: रात्रीच्या वेळी नदीपात्रातील वाळू व्यवसाय तलाठी ते तहसीलदार यांचे सहमतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त अवैध उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) उपविभागीय अधिकारी कार्यालय, देगलूर व तहसिलदार कार्यालय, देगलूर यांच्याकडून वेळोवेळी अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या अधिनस्त पथकाची नियुक्ती करण्यात आली. सदर पथकाने दिनांक १.०४.२०२२ ते दिनांक २७.०२.२०२३ पर्यंत एकूण २७ वाहनांवर कारवाई करून रूपये ५२,९४,२५०/- एवढा दंड वसुल करून शासनजमा करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) अनाधिकृत गौण खनिज उत्खनन वाहतूक रोखण्याबाबत व दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी जिल्ह्यात महसूल विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची भरारी व बैठे पथके तयार करण्यात आली आहेत.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील पाटणे आघार (ता.मालेगाव) येथील कांदा पिकावरील करपा रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत तसेच देवळा तालुक्यातील कांदा पिकासाठी खतपुरवठा करण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२४) * ६३०९५ डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात विशेषत: पाटणे आघार (ता.मालेगाव) येथील कांदा पिकावर करपा रोग पडल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच देवळा तालुक्यात (जि.नाशिक) उन्हाळ्यात कांदा लागवड अंतिम टप्प्यात आली असून कांदा पिकाला लागणाऱ्या युरिया व खतांची टंचाई निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तालुक्यात मागणीच्या तुलनेत खतांचा पुरवठा न झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कांदा पिकाला युरिया व खतांचा पुरवठा करण्याबाबत तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हयात मालेगाव तालुक्यातील पाटणे, आघार खु. ही गावे गिरणा नदी पट्टयालगत आहेत. सदर पट्टयालगत माहे डिसेंबर, जानेवारी महिन्यात वातावरणातील किंचीत बदलामुळे अल्प प्रमाणात (२ ते ५%) करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला होता.

(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) देवळा तालुक्यात डिसेंबर २०२२ मध्ये ९१२ मे.टन व मालेगाव तालुक्यात डिसेंबर २०२२ मध्ये १९६८ मे.टन युरीया खताचा साठा होता. सद्य:स्थितीत मालेगावमध्ये ८९५० मे. टन व देवळा तालुक्यात २३९० मे. टन युरिया खत उपलब्ध आहे. तसेच, सद्य:स्थितीत मालेगाव तालुक्यात इतर खते ११९८२ मे. टन व देवळा तालुक्यात ४८१२ मे. टन खते उपलब्ध आहेत. त्यामुळे देवळा तालुक्यात युरिया व खतांची टंचाई निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तसेच, करपा रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कृषी विभागामार्फत शेतकरी बांधवांना पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया व लागवडीनंतर करपा रोगाचे लक्षणे दिसून आल्यावर बुरशी नाशके यांची फवारणी करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यात आर्थिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करुन ती नियमित देण्याबाबत

**(२५) * ६३७९८ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आर्थिक व शैक्षणिक मागास विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासातून देशाचा विकास साधण्यासाठी सुरु असलेल्या शिष्यवृत्ती वाटपामध्ये अनियमितता तसेच विलंब होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याअंतर्गत शिष्यवृत्तीचे दर हे १० ते १२ वर्षापूर्वी निश्चित केले असून ते अत्यंत कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण फी, निर्वाह खर्च, अभ्यास प्रवास, टायपिंग व प्रिटिंग इत्यादी कामे या रकमेत पूर्ण होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांची आर्थिकदृष्ट्या गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सद्य:स्थितीत विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याबाबत तसेच ती नियमित मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीचे विहित शैक्षणिक शुल्क व विकास निधी हे शुल्क नियामक प्राधिकरण (एफ.आर.ए.) व तत्सम प्राधिकारणाकडून निश्चित केले जाते.

तसेच पारंपारिक अभ्यासक्रमांसाठीचे विहित शैक्षणिक शुल्क, इतर शुल्क व परीक्षा शुल्क इ. हे संबंधित प्रशासकीय विभाग, विद्यापीठ, शैक्षणिक परिषदा या सक्षम प्राधिकरणाकडून निश्चित केले जाते.

शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित केल्याप्रमाणे व केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यात येते. त्यानुसार महाडिबीटी प्रणालीवर सदरील शैक्षणिक शुल्क, विकास निधी, परीक्षा शुल्क व इतर शुल्क इ. ची रक्कम अदा करण्यात येते.

त्याचप्रमाणे राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील मुलींना देण्यात येणाऱ्या सावित्रीबाई फुले मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीच्या दरामध्ये वाढ करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(४) लागू नाही.

-----------------

**घोडबंदर (जि.ठाणे) येथील मानपाडा, पातलीपाडा व वाघबीळ जंक्शन येथे उड्डाणपुलाच्या बांधकामात एका कंपनीने केलेली फसवणूक**

**(२६) * ५७६६१ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत घोडबंदर रस्त्यावरील मानपाडा, पातलीपाडा व वाघबीळ जंक्शन येथे उड्डाणपुलाचे काम केलेल्या मे.वालेच्या इंजि.लि.कंपनी यांनी शासनाची फसवणूक करीत करोडो रुपयांचे स्वामित्वधन (रॉयल्टी) बुडविल्याने तहसीलदार, ठाणे व एम.एस. आर. डी. सी. यांनी सदरची रॉयल्टी रक्कम शासनाकडे भरण्याबाबत कंपनीला लेखी कळविल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्वामीत्वधनाची रक्कम कंपनीने शासनजमा केली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) संबंधित कंपनी यांनी मौजे माजिवाडा येथिल कापूरबावडी ते चितळसर मानपाडा, वाघबीळ, पातलीपाडा पर्यत च्या जमिनीमध्ये ४२००० ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याने दिनांक ०८.१२.२०१५ आदेशान्वये रू.५,८८,००,०००/- इतक्या रकमेचे दंडनिय आदेश पारित करण्यात आले आहे.
(२) सदर स्वामित्वधनाची रक्कम कंपनीने शासनजमा केली नाही.
(३) व (४) संबंधित कंपनी यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करणेकामी मा.महानगर आयुक्त MMRDA, ठाणे जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका आयुक्त व कार्यकारी अभियंता MSRDC यांना कळविण्यात आले आहे.संबंधित कंपनीकडून सक्तीच्या मार्गाने वसूली करणेकरीता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील प्रकरण अकरा कलम १६८ ते २२३ प्रमाणे वसूली करण्याची कारवाई सुरू आहे.

-----------------

**राज्यातील मागासवर्गीय शेतकऱ्यांना दिलेल्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावरील भोगवटादार वर्ग-२ नोंद रद्द करण्याबाबत**

**(२७) * ५९२६२ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय शेतकऱ्यांना ४० ते ४५ वर्षापूर्वी कसण्यासाठी देण्यात आलेल्या जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर पडीक क्षेत्र भोगवटदार वर्ग-२ अशी नोंद असून पड व पडीक लागवडीसाठी अयोग्य असा शेरा नमूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातबाऱ्यावरील अशा नोंदीमुळे शेतकऱ्यांना पीक, व्यवसाय व वाहन कर्ज तसेच सिंचन व्यवस्थेकरिता विहीर, बोअरवेल खोदणे, पाईप लाईन करणे व शेती विषयक कामांसाठी बँकांकडून कर्ज पुरवठा मंजूर होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांना शेतजमीन असून सुध्दा केवळ सातबारा उताऱ्यावरील नोंदीमुळे शासनाच्या योजनांपासून वंचित रहावे लागत असून कर्जाअभावी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी जाहिर होणारे अनुदान, बँक कर्ज प्रकरणे मंजूरी इत्यादीकरिता सातबारा उताऱ्यावरील जाचक नोंदी रद्द करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) नाही.
(२) व (३) नाही. राज्यस्तरीय बॅंकर्स समितीने दिलेल्या माहितीनुसार भोगवटादार वर्ग-२ अशी नोंद असलेल्या जमिनींवरील पिकांसाठी बॅंकामार्फत पीक कर्ज पुरवठा करण्यात येत आहे. तसेच सक्षम प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने व संबंधित अटींची पुर्तता केल्यास अन्य कृषी कर्ज पुरवठा सुद्धा बॅंकांमार्फत करण्यात येत आहे.
तसेच महसुल विभागाच्या दिनांक १७.०७.१९९० च्या शासन परिपत्रकानुसार ज्या शासकीय जमिनी कृषीप्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग-२ म्हणून प्रदान केलेल्या आहेत अशा भोगवटादारांना राष्ट्रीयीकृत बॅंकांमार्फत कर्जे मिळण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

### भोकर (जि.नांदेड) येथे सामाजिक वनीकरण लागवड कार्यक्रमात झालेला गैरव्यवहार

**(२८) * ५८७४७ श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) तसेच इतर ठिकाणच्या सामाजिक वनीकरण लागवड कार्यक्रमात प्रभारी विभागीय वन अधिकारी यांनी करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाच्या चौकशीसाठी विभागीय वन अधिकारी परभणी, लातूर व बीड यांच्या अधिपत्याखाली चौकशी समिती स्थापन करुन संपूर्ण कामाची चौकशी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) भोकर (जि. नांदेड) तसेच इतर ठिकाणच्या सामाजिक वनीकरण लागवड कार्यक्रमात झालेल्या अनियमिततेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीमध्ये काही प्रमाणात अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

(२) विभागीय वन अधिकारी परभणी, लातूर व धाराशिव यांची चौकशी समिती स्थापन करुन संपूर्ण कामाची चौकशी करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या वनपरिक्षेत्र अधिकारी, व वनपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र भोकर यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.